स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आज़ादी का अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

## महसूल विभाग

## विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालय (करमणुक शुल्क शाखा)

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, भारत प्रतिभूती मुद्रणालयासमोर, नाशिकरोड, ता.जि.नाशिक-४२२ १०१

Email ID- dycomentnashik@gmail.com दुरध्वनी क्र. ०२५३-२४६२४०१-५

क्र.कक्ष-१५/क.शु.१/ज.या.१७६-२०१२/कावि/८५ /२०२३ नाशिकरोड दि.२८/०२/२०२३

**इमेलव्दारे**

**प्रति,**

१. आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक
२. जिल्हाधिकारी नाशिक
३. पोलिस आयुक्त, नाशिक
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
५. प्रादेशिक अधिकारी, महा.प्र.नि.मं. (MPCB) नाशिक
६. अधिक्षक अभियंता व प्रशासक (लाक्षेविप्रा) नाशिक
७. उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, नाशिक
८. कार्यकारी अभियंता, महा.औ.वि.म.(MIDC) नाशिक
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी नाशिक
१०. मुख्य अभियंता, निर्मिती, ना.औ.विद्युत केंद्र एकलहरे
११. सहसंचालक नगररचना, नाशिक विभाग नाशिक
१२. उपसंचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, नाशिक
१३. शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग नाशिक
१४. अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग नाशिक
१५. मुख्याधिकारी, देवळाली छावणी मंडळ, नाशिक
१६ जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक
१७. निरी (NEERI) मुंबई यांचे प्रतिनिधी
१८. डॉ. प्राजक्ता बस्ते, प्राचार्य आर्किटेक्चर कॉलेज नाशिक
१९. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
२०. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

विषय :- **गोदावरी नदीचे प्रदूषण नियंत्रणाबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त..**
मा.उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्र.१७६/२०१२ संदर्भात..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, गोदावरी नदी प्रदूषण बाबत जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१८ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदूषण नियंत्रणाबाबत समितीची त्रैमासिक आढावा बैठक दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

बैठकीतील सुचने प्रमाणे आपण केलेल्या / करत असलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल संबधीत कागदपत्र, छायाचित्रांसह या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

28/2/23

( डॉ. प्राणी ताटे )
**उपआयुक्त (करमणुक शुल्क)**
**विभागीय आयुक्त नाशिक करिता**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

# विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालय

## मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र.176/2012 संदर्भात विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत दि.15/02/2023 रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

**---X-X-X-X---**

गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत आढावा घेणेसाठी श्री. राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली **दि.15/02/2023 रोजी सकाळी** 11.00 **वाजता** विभागीय आयुक्त कार्यालय येथील समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालील अधिकारी यांनी उपस्थिती नोंदवली.

1. श्री.गंगाथरन डी., जिल्हाधिकारी, नाशिक
2. श्रीमती आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
3. श्री. प्रदिप चौधरी, अतिरिक्त आयुक्त, प्रतिनिधी आयुक्त महानगरपालिका नाशिक
4. श्री. रमेश काळे, उप आयुक्त (करमणूक शुल्क ) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
5. श्री. सा.ज्ञा. शिंदे, अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाक्षेविप्राना, जलसंपदा विभाग, नाशिक
6. श्री. अमर दुर्गुळे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक
7. डॉ. वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.), जिल्हा परिषद नाशिक
8. डॉ. नितीन गोयल, प्रमुख शास्त्रज्ञ, निरी मुंबई (व्ही.सी.व्दारे)
9. श्री. जयवंत बोरसे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नाशिक
10. श्री. ज्ञा.ना.इगवे, उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
11. श्रीमती मोहिनी राणे, सहाय्यक संचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
12. श्रीमती अर्चना वि. देशमुख, जिल्हा माहिती अधिकारी (अति.), नाशिक
13. श्री. मनोज र. घोडेपाटील, उपआयुक्त, महानगरपालिका, नाशिक
14. डॉ. विजयकुमार मुंडे, उपआयुक्त, गोदावरी संवर्धन कक्ष, महानगरपालिका, नाशिक
15. श्री. एस.आर.वंजारी, शहर अभियंता, महानगरपालिका, नाशिक
16. श्री. एस.एम.चव्हाणके, अधिक्षक अभियंता, महानगरपालिका, नाशिक
17. श्री. उदय एम. धर्माधिकारी, अधिक्षक अभियंता, महानगरपालिका, नाशिक
18. श्री. आवेश पलोड, संचालक, घनकचरा व्यवस्थापन, महानगरपालिका, नाशिक
19. श्री. सुमंत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी डेव्ह.कॉ.लि.नाशिक
20. श्री. राजेंद्र शिंदे, कार्यकारी अभियंता, पर्यावरण/भु.ग.यो., महानगरपालिका, नाशिक
21. श्री. बाजीराव माळी, कार्यकारी अभियंता, यांत्रिकी, महानगरपालिका, नाशिक
22. श्री. अमोल हिरे, प्रतिनिधी प्रशासनाधिकारी, शिक्षण विभाग, महानगरपालिका, नाशिक
23. श्री. के.बी.चौधरी, व.पो.नि. प्रतिनिधी पोलिस आयुक्त नाशिक
24. श्री. लाला झाल्टे, वरिष्ठ रसायनतज्ञ, प्रतिनिधी, मुख्य अभियंता निर्मिती, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे
25. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
26. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

बैठकीच्या सुरुवातीस उपस्थिती बाबत आढावा घेण्यात आला. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ हे वैद्यकीय कारणास्तव बैठकीस उपस्थीत राहू शकत नसलेबाबत त्यांनी कळविले असुन उपप्रादेशिक अधिकारी यांना बैठकीस हजर राहणेकामी प्राधिकृत केले असल्याचे उपआयुक्त (करमणूक शुल्क) यांनी सांगितले.

| मुद्याशी संबंधीत उपसमिती/विभाग | मुद्याबाबत झालेली चर्चा व दिलेल्या सूचना | कार्यवाहक विभाग/ यंत्रणा/अधिकारी |
|---|---|---|
| मुख्य समिती | नाशिक गोदावरी नदी व पर्यावरण विषयी नाशिक जिल्हा व शहर स्थरावरील मुख्य समित्या व उपसमित्या यावर निवडलेल्या किंवा नियुक्त केल्या गेलेल्या अशासकीय सदस्य पात्रते विषयी माहिती मिळणेबाबत श्री.अमित कुलकर्णी यांचे इमेलव्दारे या कार्यालयास प्राप्त तक्रार/निवेदनाचे वाचन करण्यात आले. सदर निवेदनाबाबत बैठकीत समिती सदस्यांसमवेत चर्चा करण्यात आली व चर्चेनुसार खालीलप्रमाणे संबंधीतास उत्तर देण्याचे ठरविण्यात आले.<br>➢ मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर समितीची स्थापना करण्यात आली असुन त्याप्रमाणे सदस्य नेमणुक करण्यात आलेली आहे. सदर समितीला काही निर्णय घेण्याचे अधिकार मा.उच्च न्यायालयाने दिलेले असुन या समितीने घेतलेले निर्णय हे सर्वांवर बंधनकारक करण्यात आलेले आहेत. उपसमितीची स्थापना करण्याबाबत ज्या बैठकीत निर्णय झाला त्या बैठकीचे इतिवृत्त व त्या बैठकीचा दिनांक नमुद करुन उपसमिती स्थापनेचा याप्रमाणे निर्णय घेतलेला असल्याचे उत्तर संबंधीतास देण्यात यावे व तसे आजच्या बैठकीचे इतिवृत्तात नमुद करणेबाबत सुचना देण्यात आली. | विभागीय आयुक्त कार्यालय (करमणूक शुल्क ) |

मागील दि.१४/१०/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात दिलेल्या सुचना/निर्देशांवर संबंधित नियुक्त विभागीय उपसमित्या/यंत्रणा यांनी केलेल्या कार्यवाही/कामकाजाचा मुद्देनिहाय आढावा घेण्याचे ठरविण्यात आले.

| अ. क्र. | मुद्याशी संबंधीत उपसमिती/विभाग | मुद्याबाबत झालेली चर्चा व दिलेल्या सूचना | कार्यवाहक विभाग/ यंत्रणा/अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | नाशिक महानगरपालिका | १) STP अपग्रेडेशन, DPR स्टेटस बाबत विचारणा केली.<br>श्री. चव्हाणके, अधिक्षक अभियंता, मनपा यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>अमृत योजनेमध्ये २ STP चे काम पुर्ण झाले असुन STP अपग्रेडेशनचा प्रस्ताव सुधारीत करुन केंद्र सरकारला सादर केला आहे. या व्यतिरिक्त केंद्र सरकारकडे NRCD च्या निधीअंतर्गत मंजुरीला वेळ लागत असल्याने तपोवन व आगारटाकळी हे दोन्ही STP आता अमृत २ योजनेमध्ये समाविष्ट केले आहे. त्यांचे MJP च्या तांत्रिक मंजूरीची कार्यवाही आता सुरू आहे. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | २) NEERI कडून DPR चे Vetting करणे बाबत मागील बैठकीत चर्चा झाली होती त्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची विचारणा करण्यात आली.<br>याबाबत IIT मुंबईकडे संपर्क केला असुन DPR संबंधीचे Vetting ते करुन देणार आहेत. मागच्या आठवड्यात त्यांना वर्क ऑर्डर दिली आहे. साधारण १५ दिवसात तपसणी करुन मिळेल असे अपेक्षित आहे. IIT कडून तपासणी करुन मिळेल व त्याच दरम्यान MJP कडून तांत्रिक मंजूरी अशा दोन्ही गोष्टी एकाचवेळी होतील. MJP कडून काही अडचण नाही. त्यांची तांत्रिक मंजुरीची छाननी झालेली आहे. छाननीचा सर्व अनुपालन अहवाल त्यांना सादर केलेला आहे. Scrutiny फी अद्याप भरलेली नाही. फी देणार असले बाबत त्यांना विनंती केली होती, त्यांनी कामाला सुरुवात केली आहे. IIT ची फी सुध्दा भरली आहे. NEERI ऐवजी IIT मार्फत तपासणी करुन घेण्यात येत असल्याचे श्री.चव्हाणके यांनी नमुद केले.<br>➢ प्राधान्याने कामे पुर्ण करावी. महापालिकेकडून जी Commitment देली जाते | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ती अहवालात मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून दिली जाते आणी पुढच्या वेळेस Progress दिसली नाही तर तसे सुध्दा अहवालात नमुद केले जाते. | महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ३) सदरच्या कामास किती कालावधी लागेल याबाबत विचारणा करण्यात आली.<br>MJP कडून तांत्रिक मंजूरी झाल्यावर SLTC ला राज्य शासनास मान्यतेसाठी सादर करावे लागेल असे श्री.चव्हाणके यांनी नमुद केले. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ४) मनपा आयुक्त यांनी कल्की कल्चर (Kalki culture) म्हणुन प्रस्तावित केले होते असा मुद्दा श्री. पंडीत यांनी उपस्थित केला.<br>याबाबत श्री.मुंडे, उपआयुक्त, गोदावरी संवर्धन कक्ष यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>कल्की कल्चर बाबत पाठपुरावा सुरू असुन त्यांना डेटा देखील दिलेला आहे. त्याच्या अनुषंगाने ८-१५ दिवसात ते आपल्याकडे प्रत्यक्ष येऊन In-situ treatment काही करता येईल का त्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. त्याच प्रमाणे IIT कडे सुध्दा विचारणा केली होती. ते येथे येऊन काही Spot Study करुन गेलेले आहेत. कुठल्या नाल्यावर Treatment करता येईल व त्याची व्यवहार्यता किती आहे याबाबत त्यांनी बघितले आहे. त्याचबरोबर समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे गोदावरीचे व इतर जे-जे महत्वाचे Spot आहेत त्यांची एक संयुक्त पाहाणी देखील केली आहे. STP मधुन जे पाणी निघते त्याच्यामुळे जो फेस येत आहे त्याला कमी करण्यासाठी काही नविन तंत्रज्ञान करता येईल का किंवा अस्तित्वात असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून काही उपाययोजना करता येईल का याबाबत NEERI ला पत्र दिले आहे. त्यांच्या यंत्रणा याबाबत Study करत असल्याचे सांगितले. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका, NEERI | ५) कल्चर बाबत पुढील कार्यवाहीची NEERI चे उपस्थित प्रतिनिधी डॉ.गोयल यांना विचारणा करण्यात आली.<br>कल्चर बाबत संचालक कार्यालयाकडून अजून काही कळविण्यात आलेले नाही, आज पुन्हा त्यांचेशी बोलून उद्या पर्यंत मेल करतो असे डॉ.गोयल यांनी नमुद केले. | NEERI |
| | नाशिक महानगरपालिका, NEERI | ६) डी फॉर्मींग, डी कॉर्पस च्या वापराबाबत काही करता येईल का असा मुद्दा श्री. पंडीत यांनी उपस्थित केला.<br>सदर Issue संचालक कार्यालयास सविस्तर कळविण्यात आला आहे. अद्याप तेथून काही उत्तर आलेले नाही. याबाबत आतापर्यंत कोणतेही Technology, विक्लप Refer केल्याचे पाहिले नसलेबाबत डॉ.गोयल यांनी सांगितले. | NEERI |
| | नाशिक महानगरपालिका | ७) नंदीनी नदीत सद्या पाण्याचा प्रवाह सुरु झाला आहे, त्यासंबंधी कोणते नियोजन केले आहे. मागील वेळेस ५० ठिकाणी नदीपात्रात पाणी जात असल्याच्या मुद्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत श्री.चव्हाणके यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>५० ठिकाणांबाबत त्यावेळी चर्चा झाली होती. ती एकुण ४३ ठिकाणे असुन त्यापैकी ३५ ठिकाणांची कामे पुर्ण केली आहेत. ८ ठिकाणाची कामे कार्यवाहीत आहेत. Strom Water व्दारे मिसळणारे पाण्याच्या ठिकाणांवर सद्या कार्यवाही करत आहोत. नंदिनी नदीचे जे Intercepting Sewer आहे त्याचे Rehabiltation करावे लागणार आहे. आता महापालिकेने नमामी गोदा प्रकल्पासाठी सल्लागार नेमलेले आहे ते संपुर्ण सांडपाणी व्यवस्थेचा अभ्यास करत आहेत. त्यादृष्टीने त्याला सोलुशन घ्यावे लागणार आहे. Rehabiltation | आयुक्त महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आणि Parallel Sewer टाकावे लागणार असुन त्याचे प्रपोजल करावे लागणार आहे. तोपर्यंत जेथे-जेथे शक्य आहे तेथे नाल्यामध्ये Diversion चे प्रपोजल दिले आहे. त्याव्यतिरिक्त काही नाल्यांमध्ये ते शक्य नाही तेथे Nala in-situ treatment करता येईल किंवा कसे बाबत IIT कडून माहिती घेण्यात येत आहे. त्याबद्दलही ते अभ्यास करुन कळविणार आहे. | |
| | | ➢ महापालिकेने Action taken report मध्ये काही नमुद केलेले नाही. Sewage Audit बाबत कोणती कार्यवाही प्रस्तावित केली ते नमुद करायला पाहिजे. प्रत्येक मिटींगला Sewage Audit ची फक्त चर्चाच होत आहे व वालदेवी, नंदीनी, गोदावरी मध्ये, कार्बन नाला पासुन सर्व ठिकाणी सांडपाण्याचे प्रवाह चालु आहेत. याकामांसाठी महापालिकेने जी काही कालमर्यादा ठरविली आहे त्याची पुढील वेळेस सविस्तर माहिती द्यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ महापालिकेच्या सर्व संबंधीत यंत्रणांनी नंदिनी व इतर सर्व नद्या, नाल्यांची आता समक्ष जाऊन पहाणी करावी, प्रदुषण रोखण्यासाठी तातडीने काय-काय उपाययोजना आज करता येईल ते पहाणीमुळे कळू शकेल. ज्या ठिकाणी चेंबर, पाईप फुटले आहे त्याची दुरुस्ती करणे, लिकेजेस असतील तर ते बंद करणे, कुठे पाणी Divert करायचे असेल ते करणे, सांडपाणी नदीत जाण्यापासून थांबविणे याप्रमाणे कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ जी ५० ठिकाणे आहेत त्याची यादी द्यावी व त्यापैकी किती ठिकाणांची कामे पुर्ण झाली व उर्वरित ठिकाणाची कामे कधी पुर्ण होतील याची विश्लेष्णात्मक सविस्तर माहिती कालमर्यादेसह देण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ नदीपात्रातुन उचल होणारे पाणी, प्रक्रिया केलेले पाणी व प्रक्रिया करुन पुन्हा नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी याचे ऑडीट करणे गरजेचे आहे. सर्व नद्यांचे पाण्याचा ऑडीट संबंधीची माहिती देण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या सर्व कामांची कालमर्यादेसह सविस्तर माहिती पुढीलवेळी देण्यात यावी जेणेकरुन त्या कामांचे Monitor करणे सोयीचे होईल. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ८) प्लास्टीक व रासायनीक कचरा बाबत विचारणा केली.<br>प्लास्टिक वेस्ट व इतर कचरा बाबत महापालिकेकडून दंडात्मक कारवाई नियमित चालू असलेबाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले.<br>नागरीकांमध्ये जनजागृती होणेकरीता विविध प्रकारचे उपक्रम नियमित राबविण्यात येत आहेत, त्यासंबंधी बातम्या देण्यात येत असुन दंडात्मक कारवाई सुध्दा करत असल्याचे संचालक घनकचरा व्यवस्थापनचे श्री.आवेश पलोड यांनी माहिती दिली. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ९) पाणवेलीचे सद्याचे स्टेटस व पाणवेली काढण्याबाबत विचारणा केली.<br>याबाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले की, मागच्या वर्षीपेक्षा या वर्षी पाणवेलींचे प्रमाण कमी आहे, परंतु शेवाळ जास्त प्रमाणात आले आहे. ट्रॅश स्कीमरने काढतांना ते बऱ्याच प्रमाणात परत पडून जात आहे.<br>ट्रॅश स्कीमरच्या बेल्ट वरुन शेवाळ परत खाली पडून जात आहे. मशीनवर व बेल्टला आता नेट्स लावण्याची एक ट्रायल घ्यावी लागणार आहे. जेणेकरुन शेवाळ त्यावर येऊ शकेल. ट्रॅश स्कीमरने पाणवेली निघतात परंतु बारीक शेवाळ तसेच राहते व परत ते पाण्याच्या ओघाने मशीनवरुन खाली पडून जाते. साधारण ८ ते ८$^{१/२}$ टन पाणवेली निघालेली आहे. याबाबत अंदाज घेतला असुन सगळीकडून पाणवेली उचलून खालील बाजूस आणणे शक्य होत नाही. जेथे कोरडा भाग आहे तेथे त्या टाकण्यात येत आहे. एकदा ते जेवढे लिफ्ट करता येत होत तेवढे लिफ्ट करुन एक अंदाज घेतला आहे व त्याप्रमाणे नियमित ट्रिप्स | आयुक्त महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चालू असलेबाबत श्री.पलोड यांनी माहिती दिली. | |
| | नाशिक महानगरपालिका | १०) पाणवेलीचे कंम्पोस्टिंग बाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची विचारणा केली.<br>याबाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले की, पाणवेलीच्या कंम्पोस्टिंगच्या अनुषंगाने आपण Shredding machines घेत आहोत. Shredding machine मुळे पाणवेलीचे कंम्पोस्टिंग प्रोसेस लवकर होते. दहा Shredding machines चे प्रपोजल असुन ते घेण्याची प्रोसेस सुरूआहे. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ पाणवेलीचे कंम्पोस्ट करुन त्याचा महापालिकेच्या गार्डन मध्ये वापर करावा. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ११) कापडी पिशव्यांचे एटीएम मशीन लावण्याबाबत मागील वेळेस चर्चा झाली होती त्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत श्री.पलोड यांनी नमुद केले की, त्याबाबत कार्यवाही करण्यात येत असुन दंडात्मक कार्यवाही बऱ्यापैकी सुरू आहे. साडे बावीस, तेवीस लाख रुपये दंड करण्यात आला आहे. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ रामकुंडावरील प्लास्टीकचा वापर कमी करण्यासाठी Compulsory कापडी पिशव्याचे मशीन लावण्यात यावे. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ प्लास्टीक पिशव्यांचा वापर करु नये, पुजेचे साहित्य, निर्माल्य टाकू नये याबाबत पुरोहित संघ, पुजारी मंडळांना लेखी कळवा. जे नियम मोडतील त्यांच्यावर कारवाई करा. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ रामकुंडावर निर्माल्य कलशांची व Dustbin ची संख्या वाढविण्यात यावी. घंटागाडीच्या फेऱ्या वाढविण्यात याव्या. सितागुफा, रामकुंड अशा १-२ ठिकाणी कापडी पिशव्याचे मशीन लावण्यात यावे. | आयुक्त महानगरपालिका |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | १२) प्लास्टीकचे बाबतीत एमआयडीसी परिसरात केलेल्या कार्यवाही बाबत एमपीसीबीला विचारणा करण्यात आली.<br>याबाबत एमपीसीबीचे उपप्रादेशीक अधिकारी श्री.अमर दुर्गुळे यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>प्लास्टिक वापर बंदीबाबत १-२ कंपन्यांचे CSR मधुन कापडी पिशव्या आपण बनवुन घेतल्या. एमआयडीसीच्या परिसरामध्ये जो प्लास्टीक कचरा आहे तो क्लेकशन करणे किंवा तेथील जे कामगार आहेत त्यांच्यामध्ये जनजागृती करणेच्या अनुषंगाने २ कंपन्यांमध्ये कार्यक्रम घेण्यात आले आहे. महापालिका हद्दी बाहेरील नगरपालिका क्षेत्र, जिल्हा परिषद क्षेत्र येथून किती प्लास्टीक दररोज गोळा केले जाते किंवा प्लास्टीक कचरा बाबत काय जनजागृती केली याची पण नियमित माहिती घेत असतो. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | १३) प्लास्टीक वापर करणाऱ्यांवर काही कारवाई, गुन्हे दाखल केले आहेत का याबाबत विचारणा करण्यात आली.<br>सद्या त्यांना दंड करण्यात येत आहे. तीसऱ्यावेळी आढळून आल्यास गुन्हा दाखल करण्याची तरतूद असले बाबत श्री. दुर्गुळे यांनी सांगितले. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | | ➢ बाजारात बंदी असलेल्या प्लास्टीक पिशव्याचा वापर होत असल्याचे सर्वांना दिसून येईल. बंदी असलेल्या प्लास्टीकचे साठवणुकदार, घाऊक व्यापारी, आयात करणारा/खरेदी करणारा व्यापारी यांचेवर मनपा व प्रदुषण नियंत्रण मंडळाने कडक कारवाई सुरू करावी. बंदी असलेले प्लास्टीक कोठून येते याचा पोलिसांच्या मदतीने मनपा व प्रदुषण नियंत्रण मंडळाने शोध घेऊन कारवाई करावी. | आयुक्त महानगरपालिका, पोलीस आयुक्त, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | १४) ग्रामीण भागातील गोळा केलेले प्लास्टीक रिसायकलींगला देण्यासाठी एमपीसीबी ट्रासंपोर्टेशनची सोय करणार याबाबत विचारणा करण्यात आली. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याबाबत श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले की,<br>प्लास्टीक वेस्ट जर एका ठिकाणी व्यवस्थित गोळा केलेले असेल तर आपल्याकडे एक रिसायकलर आहे तो ते वेस्ट गोळा करायला तयार आहे, २-४ ठिकाणी असेल तरी ते गोळा करतात. मागे आपण १०-१५ लोकांना सदरचे काम दिले होते. परंतु त्यास पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. तसेच त्यातले चांगले मटेरियल गोळा करणारे काढून घेत असुन व फक्त वेस्ट मटेरियलच रिसायकलरला देत असल्यामुळे त्यांनी रिसायकलींग करु शकत नसलेबाबत सांगितले. त्यांना पुर्ण प्लास्टीक वेस्ट दिले तर ते घ्यायला तयार आहेत.<br>➢ तेथील ही प्लास्टीक गोळा करा. त्याचबरोबर भगुर, त्रिंबक, सिन्नर या आजुबाजूच्या परिसरातील ड्राय प्लास्टीक ही गोळा करावे. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका, शिक्षण उपसंचालक | **१५**)मनपा शिक्षण विभागाने जनजागृतीबाबत केलेल्या कार्यवाहीची विचारणा करण्यात आली.<br>याबाबत उपस्थित प्रतिनिधी श्री.अमोल हिरे यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>शिक्षण विभागामार्फत मुलांच्या प्रभात फेऱ्या काढल्या आहेत. पथनाट्य बसविले आहेत.<br>➢ तारीख निहाय केलेल्या कामाची माहिती दिली पाहीजे.<br>दि. २५ ऑगस्ट २०२२ रोजी निर्माल्य व इतर कचरा नदीत टाकू नये याबाबत विद्यार्थ्यांमार्फत शाळेत जनजागृती केली आहे. तसेच काही विद्यार्थ्यांमार्फत गोदावरी किनारी साफसफाई सुध्दा केलेली आहे. २५ सप्टेंबर रोजी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना निर्माल्यापासून खत कसे बनवाचे याची माहिती तयार करुन घेतली व जनजागृती केली आहे. ऑक्टोंबर महीन्यामध्ये प्लास्टीक कचरा हा नदीत टाकू नये ह्याच्यासंबंधी जनजागृती महानगर पालिकेच्या शाळेमधुन कार्यक्रम घेतले होते. २५ नोव्हेंबरला नदी स्वच्छतेचे उपक्रम घेतलेले आहेत. त्यामध्ये निबंध स्पर्धा व इतर स्पर्धा विद्यार्थ्यांमार्फत घेतलेल्या आहेत. २५ डिसेंबरला काही ठराविक शाळांमध्ये मी गोदावरी नदी बोलते हे एकपात्री नाटक विद्यार्थ्यांकडून करुन घेतले आहे. गोदावरी संवर्धनाचे गीत KTHM कॉलेजला २००० मुलांमार्फत गायन करुन घेतले आहे. मनपाच्या शाळांमध्ये रोज परिपाठाचेवेळी गोदावरीचे गीत प्रार्थनेसोबत विद्यार्थ्यांकडून म्हणून घेत असलेबाबत उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| | प्रचार व प्रसिध्दी उपसमिती | ➢ FM ला बऱ्यापैकी श्रोते आहेत. गोदावरीचे गीत FM ला जेवढे केंद्र आहे त्यावर वाजता येईल असे पहावे. एक मिटींग बोलवुन सर्व FM केंद्रांशी चर्चा करा. | उपसंचालक, विभागीय माहिती, |
| | जिल्हा परिषद | ➢ सायखेडा येथेही गीत गायनाचा कार्यक्रम आहे. त्याबाबत श्री.संजय गिते यांचेशी संपर्क करावा, जिल्हा परिषदेने तेथे जनजागृती बाबत पाहावे. | मु.का.अ. जिल्हा परिषद, |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ रामकुंडावर विविध शाळांमार्फत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्याबाबत महानगर पालिकेने कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | **१६**)गोदावरी संवर्धनाबाबत वेबसाईटचे Issue व त्यावरील प्राप्त तक्रारींबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत श्री.मुंडे यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>तक्रारीचे अनुषंगाने व वेबसाईटचे अनुषंगाने जे सॉफ्टवेअर्स आहेत त्याचे Upgraedation ची पुढील प्रोसेस चालु आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या ॲपचा सुध्दा विषय आहे. काही नवीन issues point out झाले आहेत. त्यावरही काम सुरु आहे. जसे की IOS System मध्ये ॲपच्या तक्रारी पुढे जात नाही त्यावरही काम करत आहेत. तसेच ज्या तक्रारी आल्या आहेत त्यांचीही पुर्तता करत आहे. | आयुक्त महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ➢ तक्रारींची संख्यात्मक माहिती दिली पाहिजे. गोदावरी प्रदुषाच्या संदर्भात किती तक्रारी आल्या, किती तक्रारींचे निराकरण झाले, किती प्रलंबित आहे, प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत अशी माहिती देता आली पाहिजे. | आयुक्त महानगरपालिका |
| | ना.मु.स्मार्टसिटी कॉ.लि. | **१७)**लेंडी नाल्याच्या स्थिती बाबत स्मार्टसिटी यांना विचारणा करण्यात आली.<br>याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे यांनी लेंडी नाला पुर्ण १००% बंद केला असलेबाबत माहिती दिली. श्री.पगारे यांनीही लेंडी नाला बंद झाला असलेबाबत नमुद केले. | मु.का.अ. स्मार्टसिटी |
| | नाशिक महानगरपालिका | **१८)**गोदावरी नदी व इतर नद्या व नाल्यांवरील अतिक्रमण संबंधी महापालिकेने मोहिम घेऊन पुढील वेळी संख्यात्मक माहिती दिली पाहिजे. अतिक्रमणामुळे देखील प्रदुषण होते. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | **१९)**नाशिक महानगर पालिका प्रशासनाच्या वतीने गोदावरी नदीत मलनिस्सारणाचे सांडपाणी सोडले जात असलेबाबत श्री.पगारे यांनी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीत नमुद मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली.<br>➢ सदर तक्रारीवर महापालिका आयुक्त यांनी पुढील कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका |
| २. | म.प्र.नि.मंडळ नाशिक | **१)** एमपीसीबीने केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी नुमद केले की, दि.२२/११/२०२२ रोजी व्हिजीट केली होती त्यामध्ये महानगर पालिकेची सांडपाणी पाईप लाईन तुटन सांडपाणी नदीत जात असल्याचे आढळून आले व काही डेब्रीज, C&D वेस्ट हे नदीच्या लगत टाकल्या जात असल्याने त्याबाबत महापालिकेला नोटीस बजावण्यात आली आहे. परवा ही एका ठिकाणी गेलो होतो. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | **२)** C&D प्लांटचे स्टेटस बाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत महापालिकेचे प्रतिनिधी यांनी नमुद केले की, प्रकल्पाचा PLI दिला आहे. २-३ दिवसात वर्क ऑर्डर व ४ ते ५ महिन्यात काम होईल, PPP तत्वावर केले आहे. कलेक्शन पासुन प्रोसेसिंग पर्यंत संपुर्ण एकाची जबाबदारी राहील असे सांगितले. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ सद्या जे कोणी नदीच्या कडेला, रस्त्याच्या कडेला डेब्रिज टाकत आहेत त्यांचेवर कारवाई करावी. शहरात जुनी बिल्डींग पाडली जाते, उत्खन्न केले जाते, जेथे काम चालू आहे तेथे जावे. त्यांनी काढलेले मटेरियलची कोठे विल्हेवाट लावली हे त्यांना विचारले पाहिजे. संबंधीत प्लॉटधारकाला नोटीस दिली पाहिजे.<br>दंडात्मक कारवाई सुध्दा करण्यात येत आहे. आता युजर चार्जेस करुन एक टोल फ्री नंबर सुध्दा देत आहोत. जेणेकरुन घरातील जे छोटे-मोठे डेब्रिज आहे ते टोल फ्री नंबर वर फोन केला तर तेथुन लिफ्ट करुन घेता येतील व चार्जेस भरुन घेता येतील अशी माहीती श्री.पलोड यांनी दिली. | आयुक्त महानगरपालिका |
| | | ➢ महापालिका व एमपीसीबी या दोन्ही यंत्रणांनी कारवाई करावी. | आयुक्त महानगरपालिका, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | **३)** सध्याचे BOD, COD Value संबंधीच्या Dispute बाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले की, महापालिकेला दिलेल्या संमतीपत्रात जे डिझाईन, नॉमर्स नमुद आहेत. त्यापेक्षा Disposal चे पॅरामिटर जास्त येत आहे. BOD १० च्या वर येत आहे. STP Upgrade करावे लागतीलअसे नमुद केले.<br>याबाबत मनपाचे श्री.चव्हाणके यांनी नमुद केले की, एमपीसीबीचे रिपोर्ट व महापलिकेचे रिपोर्ट हे आता मॅच होत आहेत. साधारण २० ते २२ च्या दरम्यान BOD येत आहेत. तपोवन मध्ये सुरुवातीचा एक STP ३० BOD चा आहे व नंतरचा एक STP २० BOD चा आहे. दोन्हींचे effluent एकत्रित flow | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ<br><br>आयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नदीला जात असुन तो साधारण २०-२२ च्या दरम्यान त्याची Value येत आहे.<br>➢ महापालिकेने STP Upgradation चे काम लवकर पुर्ण करावे. एमपीसीबीने नियमित तपासणी करावी. | महानगरपालिका, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | ४) एमपीसीबीच्या समितीने २ वेळा व्हिजीट केलेली आहे. एक वेळा औद्योगिक क्षेत्रातील इंडस्ट्रीजच्या काही ZLD ची पाहाणी केली होती. काही नाले ०३ जानेवारीला सुध्दा व्हिजीट केले असल्याचे श्री. दुर्गुळे यांनी सांगितले.<br>➢ प्लेटेड इंडस्ट्रीजचा कार्बन नाल्यामधून किती फ्लो चालू आहे याबाबत विचारणा करण्यात आली.<br>नाल्यामधून आता कुठल्याही इंडस्ट्रीजचा डिस्पोजल फ्लो नाही. वरच्या बाजूला काही रहिवासी घरे आहेत तेथुन बरेच पाणी खाली नाल्यात येत असलेबाबत श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ<br><br>प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ महापालिकेने तपासून करुन कारवाई करावी. संबंधितांनी STP बसविला पाहिजे. Sewer line करत नसतील तर त्यांना Completion certificate देऊ नये. बांधकाम परवानगी देतांना त्यामध्ये अटी टाका. Building Site पाहून Soppit किंवा STP बसविणे Mandadory करावे. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ५) महापालिकेने नाल्यांच्या मोजणीची मोहिम सुरु केली होती. २२ नाल्यांपैकी किती नाल्यांची मोजणी झाली व हद्दी फायनल झाल्या. नाल्यांची माहिती कागदावर आल्यास तो बुजविला आहे किंवा नाही ते कळेल.<br>याबाबत श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले की नगररचना विभागाने सर्व्हे केला आहे. त्यांचे सर्व नकाशे तयार करुन घेतले आहेत.<br>➢ सर्व नाल्यांचे नकाशे वेबसाईटवर टाकावे जेणेकरुन नागरीकांना नाल्यांची माहिती कळू शकेल. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ६) काही ठिकाणी नाल्यांच्या बेसमध्ये Concretization सुरू असलेबाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>➢ सोमेश्वर नवश्या गणपती जवळ, शान मोटर्सची बॅकसाईड, गोंविदनगर, अशोका हॉस्पीटल जवळचे नाले, या ३-४ तक्रारीबाबत पुढच्या मिटींगवेळी feedback द्यावा.<br>➢ नाल्यांबाबतचे जे Box Design महापालिका मंजुर करते, बेसमध्ये Concretization करतात त्याबाबत महापालिकेने कार्यपध्दती ठरवावी व दोन्ही मुद्यांची माहिती द्यावी. याबाबत IIT किंवा NEERI चे Expert Opinion घ्यावेत. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ७) नंदीनी नदीला बऱ्याच ठिकाणी बेसला Concretization करत असल्याबाबत श्री.पगारे यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>➢ नदीला ज्याठिकाणी बेस Concretization चालू असेल ते काम तात्काळ थांबवा. जो पर्यंत NEERI चे Clearance मिळत नाही तोपर्यंत ते काम थांबवा. NEERI चे Technical Opinion घ्यावे, मगच पुढच काम करावे. पुढच्या बैठकीत NEERI चे Opinion ठेवावे. | आयुक्त महानगरपालिका, NEERI |
| ३. | म.औ.वि.म. नाशिक | १) एमआयडीसी चे CETP संदर्भात विचारणा करण्यात आली.<br>याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री.बोरसे यांनी नमुद केले की,<br>CETP बाबत निरीकडून अहवाल प्राप्त झाला असुन सदरचा अहवाल नाशिक महानगर पालिका पाठविला आहे. त्यांनी त्याच्यावर अभ्यास करुन काही Queries केल्या आहेत. त्याबाबतीत १७ तारखेला परवा महापालिका आयुक्तांबरोबर एक मिटींग ठेवलेली त्यात NEERI चे प्रतिनिधी सुध्दा येणार आहेत. अंतिम टप्प्यात आहे. त्यांचेकडून NOC पाहिजे आहे. NEERI ने CETP | कार्यकारी अभियंता म.औ.वि.म. |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाशिक महानगरपालिका, म.औ.वि.म. नाशिक | चे जे Treated effluent असणार आहे ते महानगर पालिकेच्या Manhole ला जोडण्याबाबत Technically feasible आहे असा रिपोर्ट दिला असल्याचे नमुद केले.<br>➢ Plated Industries मधुन निघणारे effluent चा TDS हा ३०००० असुन महापालिकेचा कुठलाच STP हा Heavy Metal व High TDS चे effluent treatment करु शकत नाही. त्यांचे System त्याप्रमाणे design नाही.<br>याबाबत महापालिकेचे श्री.चव्हाणके यांनी नमुद केले की, NEERI ने Interim Report दिलेला असुन त्यामध्ये COD व TDS साठी Primary feasible आहे असे नमुद आहे. परंतु Metal Finisher जे आहे, Toxic Metals व Heavy Metals याबाबत Study करत असून त्याचा Final report नंतर देणार असल्याचे नमुद केले आहे. Heavy Metals व Toxic Metals बाबत त्यांचे Final Opinion आलेले नाही. त्याच्यानंतर परवानगी देता येईल. | आयुक्त महानगरपालिका |
| | म.प्र.नि.मं. नाशिक | ➢ एमपीसीबीने TDS किती आहे याची पहाणी करावी.<br>२) सदरचा निर्णय होईपावेतो त्या Industries बंद ठेवाव्या असा श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>➢ एमपीसीबीने सदर बाबत निर्णय घ्यावा.<br>➢ कंपन्यांचे Untreated effluent सद्या कोठे जाते याबाबत विचारणा केली.<br>याबाबत उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले की, सर्व कंपन्यांना आता ZLD करायला लावले आहे. सद्या त्यांच्या Premises मध्येच त्यांना Reuse करायला सांगितले आहे. पुर्वी Primary Treatment करुन बाहेर सोडत होते. त्यामुळे जवळ-जवळ ८५ Industries ला Closer दिला होता. Closer दिल्यावर Restart च्या वेळी त्यांना त्यांचे Treated water सुध्दा बाहेर सोडायचे नाही या अटीवर परवानगी दिली आहे. त्याच्या अनुषंगाने त्यांना Post evaporation आणि RO system बसवुन घेतली आहे. त्यांना पुर्ण पाणी त्यांचे System मध्ये Reuse करायच्या अटीवर Industry Operations ला मंजुरी दिली आहे. CETP feasible होत नाही म्हणुन Industry बंद ठेवणे त्याऐवजी आपण त्यांचेकडून ZLD करुन घेतले आहे. CETP feasible करण्यासाठी त्यांना Running Cost खुप येत होती म्हणुन त्याचा Discharge हा Norms मध्ये आणुन महापालिकेच्या Network ला जोडणे असे असल्याचे श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले.<br>सगळीकडे ZLD असेल तर CETP ची गरज काय असा मुद्दा श्री.पंडीत यांनी उपस्थित केला.<br>➢ Treat करुन Recycle होत असुन Discharge होत नाही. Without recycle एकही एजन्सी चालु नाही असे त्यांचे Statement आहे. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं.<br>प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं. |
| | म.प्र.नि.मं. नाशिक | CETP पुढे जाऊन करावाच लागणार आहे. कारण सद्या कंपन्यांची ही Temporary Arrangement आहे. पुढे जाऊन effluent वाढल्यावर त्यांना गरज पडणार असल्याचे श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं. |
| | म.औ.वि.म, म.प्र.नि.मं., महानगरपालिका | ➢ ZLD बाबत जी काही Treatment चालू आहे त्याची एमआयडीसी, एमपीसीबी व महानगरपालिकेच्या उपसमितीने औद्योगिक क्षेत्रात Joint Visit करावी. | एमआयडीसी, एमपीसीबी, महापालिका |
| | म.औ.वि.म. नाशिक | ➢ CETP बाबत Technical Study लवकर पुर्ण करुन कार्यवाही करावी. | कार्यकारी अभियंता म.औ.वि.म. |
| ४. | पोलिस विभाग नाशिक | १) गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाचे अनुषंगाने पोलीस विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत पोलिस आयुक्त कार्यालयाचे उपस्थित प्रतिनिधी श्री.के.बी.चौधरी, | पोलिस आयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | <br>पोलिस विभाग<br>नाशिक | व.पो.नि. यांनी नमुद केले की, माहे जानेवारी २३ मध्ये एकुण ३६ केसेस करण्यात आलेल्या आहेत. मागच्या वर्षी एकुण ४६९ केसेस झालेल्या आहेत.<br>२) श्री. पंडीत यांनी ४ PSI, ३० पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबतचा मुद्दा उपस्थित केला.<br>➢ मा. उच्च न्यायालयाने पोलिस स्टाफ देण्याविषयी जो आदेश दिला आहे त्याबाबतचा प्रस्ताव पोलिस विभागाने DG ना पाठविला होता व तो मंजुर झाला नाही. त्याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्याबाबत सांगितले होते त्यासंबंधी केलेल्या कार्यवाहीची विचारणा करण्यात आली.<br>वरिष्ठांकडून याबाबत माहिती घेतो. मागच्यावेळी वरिष्ठांनी सांगितले होती की, प्रदुषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाकडुन सुरक्षा रक्षक उपलब्ध करून घ्यायला सांगितले असल्याचे श्री.चौधरी यांनी नमुद केले.<br>➢ स्वतंत्र पोलिस बळ देण्यास पोलिस विभागाचे जे काही म्हणने आहे ते सिव्हील ॲपलिकेशन मध्ये नमुद करुन मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणुन द्यावे. जी काही वस्तूस्थिती असेल ती मा. उच्च न्यायालयासमोर मांडण्यात यावी. | <br><br><br>पोलिस आयुक्त<br><br><br>पोलिस आयुक्त |
| ५. | जिल्हा परिषद<br>नाशिक<br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br>जिल्हा परिषद<br>नाशिक<br><br><br><br>जिल्हा परिषद<br>नाशिक<br><br><br><br><br>जिल्हा परिषद<br>नाशिक<br><br>नाशिक | १) ग्रामीण भागातील STP बाबत.<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>जिल्हा परिषदमध्ये नदी लगतचे एकुण ८ मोठे गावे आहेत. त्यापैकी ओढा, एकलहरे व गोवर्धन या ३ गावांपैकी गोवर्धनच्या STP प्लांटचे काम पुर्ण झाले आहे व तिथे IIT Mumbai यांचेमार्फत प्रशिक्षण सुध्दा झाले आहे. ओढा व एकलहरे येथील STP प्लांटचे काम पुर्ण झालेले असुन प्रशिक्षण झालेले नाही ते एक आठवड्यानंतर होणार आहे. ३ ठिकाणी STP प्लांट सुरु होणार आहे.<br>➢ शिलापुर, कालवी, हिंगणवेढे व बाकीचे STP बाबत विचारणा करण्यात आली.<br>सदर ठिकाणी प्रोसेस सुरु आहे. लाखलगांव, महादेवपुर या २ ठिकाणी STP प्लांट चे काम झालेले आहे. संसरी, सायखेडा, चांदोरी या ३ मोठ्या गावांचे टेंडर आता करायचे आहे. याव्यतिरिक्त इतर ४५ लगतचे गावे आहेत तेथे प्रत्येक ठिकाणी प्रत्येक गावाला १००% Soppit बनविण्याचे नियोजन सुरु आहे. गावे निवड केली असुन BDO ची मिटींग घेतली आहे. ४५ गावांमध्ये १००% Soppit चे काम झाल्यावर कोणत्याही गावामधुन सांडपाणी पुढे नदीला जाणार नाही.<br>२) कागदी पिशव्या, कापडी पिशव्या बनविण्यासाठी SHG ची ट्रेनिंग सुरु करणार आहोत. Already हरसुलला Entrepreneurship ची ट्रेनिंग सुरु झाले आहे आणि बाकीचे ठिकाणीं सुध्दा कापडी पिशव्यांचे ट्रेनिंग सुरु करु. तसेच आपल्या सुचने प्रमाणे गोदावरीच्या उगमाचे ठिकाणी आम्ही व्हेडींग मशीन बसवू शकतो.<br>३) पाणवेलीच्या अनुषंगाने केरळ व्हिजिटबाबत.<br>नदी पत्रात निर्माण होणाऱ्या पाणवेलीबाबत केरळ व्हिजिटसाठी १५ लाख रुपये निधी मागणीचा प्रस्ताव Director SBM यांना पाठविला आहे. आता त्यांचेकडे निधी उपलब्ध नाही, एप्रिल मध्ये देऊ शकतो असे सांगितले आहे. पुन्हा एकदा Follow Up करुन निधी मिळाल्यावर केरळ व्हिजिट करता येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमुद केले.<br>४) १५ गावांमध्ये प्लास्टीक कचरा व्यवस्थापन युनिट करावयाचे होते. त्याचे टेंडर MCC मुळे थोडा उशिर झाला. आता टेंडर झाले असुन अंतिम तारीख २३ आहे. त्याच्यानंतर याबाबत कार्यवाही होणार आहे.<br>➢ चांदोरी, सायखेडा येथे वेळ आलीतर पाणवेली काढण्यासाठी महापालिकेकडे | मु.का.अ.<br>जिल्हा परिषद<br><br><br><br><br><br><br>मु.का.अ.<br>जिल्हा परिषद<br><br><br><br><br><br><br>मु.का.अ.<br>जिल्हा परिषद<br><br><br><br>मु.का.अ.<br>जिल्हा परिषद<br><br><br><br><br>मु.का.अ.<br>जिल्हा परिषद<br><br>आयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | महानगरपालिका, जिल्हा परिषद नाशिक<br><br><br><br><br><br><br><br>नाशिक महानगरपालिका<br><br><br><br>जिल्हा परिषद नाशिक | ट्रॅश स्कीमरचा वापर पुर्ण होत नसेल तर जिल्हा परिषद ट्रॅश स्कीमरच्या ट्रान्सपोर्टची व्यवस्था करतील आणि तेथील ग्रामपंचायतींना पाणवेली काढण्यासाठी काही दिवस वापरावयाला दिले पाहीजे. किमान पावसाळ्यापुर्वी तेथील पाणवेली काढण्यासाठी महापालिकेने जिल्हा परिषदेला काही दिवस ट्रॅश स्कीमर दिला पाहिजे असे मागे ठरले होते यासंबंधी विचारणा करण्यात आली.<br>याबाबत महापालिकेचे श्री.मुंडे यांनी नमुद केले की, ट्रॅश स्किमर संदर्भात यावर्षी पाणवेली काढण्यास लवकर सुरुवात करण्यात आली आहे. लोड बऱ्यापैकी आहे. आता सद्या ट्रॅश स्किमरचा गोदावरी मध्ये वापर होत आहे. बाकीच्या नद्यांमधील पाणवेली काढण्यासाठी सुध्दा ट्रॅश स्किमर लागणार आहे.<br>➢ ट्रॅश स्कीमरचा DPR वाचण्यात यावा, ट्रॅश स्कीमर Per day किती तास चालणार, किती Quaintity पाणवेली गोळा करणार आणी त्याप्रमाणे Utilized होते किंवा नाही ते पहावे. त्याप्रमाणे मिटींगला आकडेवारी देण्यात यावी.<br>५) भंडारदरा येथील प्लास्टीक कचरा संकलन इगतपुरी येथे घेणेबाबत.<br>याबाबत अहमदनगर जिल्ह्याशी संपर्क केला होता. अकोले तालुक्यातील प्लास्टीक कचरा व्यवस्थापन युनिट हे भंडारदरा येथे होणार असल्याने ते नाशिक जिल्ह्यास देणार नसलेबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.फडोळ यांनी नमुद केले. | महानगरपालिका, मु.का.अ. जिल्हा परिषद<br><br><br><br><br><br><br><br>आयुक्त महानगरपालिका<br><br><br><br>मु.का.अ. जिल्हा परिषद |
| ६. | जलसंपदा विभाग, नाशिक महानगरपालिका<br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br>नाशिक महानगरपालिका | १) रेड लाईन, ब्ल्यु लाईन मार्किंग बाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग, श्री.शिंदे यांनी नमुद केले की, रेड लाईन, ब्ल्यु लाईन मार्किंग यापुर्वी झालेले आहे. महापालिकेला Flood च्या Discharge प्रमाणे मार्किंग करुन पाहिजे आहे. नदीमध्ये पुर आला तर ते कुठ पर्यंत पुर पाणी असेल. रेड लाईन, ब्ल्यु लाईनच्या मधल्या लाईन्स त्यांना पाहिजे आहे. आमच्याकडे सर्व्हेसाठी निधी नाही. त्यामुळे गोदावरी नदीच्या सर्व्हेचे १५ लाख रुपयाचे इस्टीमेट महापालिकेला दिले असल्याचे नमुद केले.<br>➢ महापालिकेने जलसंपदा विभागास रेड लाईन, ब्ल्यु लाईन मार्किंगच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. नदीतुन होणाऱ्या विसर्ग कुठल्या Level पर्यंत किती क्युसेक होतो, त्याचे जलसंपदा विभाग मार्किंग करुन देईल. त्याचा फायदा लोकांचे स्थलांतर करण्यासाठी, विकास कामांसाठी होईल. बांधकाम परवानगी देतांना सुध्दा Clearity येईल. अतिक्रमण होणार नाही. शहरात एक Visibility राहील. पुराचेवेळी होणारा विसर्ग व मार्कींगमुळे लोक स्वताहून जागृत होऊन स्थलांतराची तयारी करतील. त्यामुळे लोकांची जिवितहानी, वित्तहानी टाळायला मदत होईल.<br>➢ नंदीनी, वालदेवी व शहरातील इतर सर्व नद्यांचे सुध्दा रेडलाईन, ब्ल्यु लाईन मार्किंग करण्यात यावे. महापालिकेने त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा.<br>रेड लाईन, ब्ल्यु लाईन मार्किंग बाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले की, महापालिकेचा शहरात जी.आय.एस. सर्व्हे चालू आहे. जी.आय.एस. सर्व्हेअंतर्गत मॅपींग करण्यात येणार आहे. त्यांचेकडून सुध्दा डाटा घेणार असल्याचे नमुद केले. | अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग<br><br><br><br><br><br><br>आयुक्त महानगरपालिका, अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग<br><br><br>आयुक्त महानगरपालिका, अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| ७. | नाशिक महानगरपालिका, ना.म्यु.स्मार्टसिटी डे.कॉ.लि. | १) रिटेनिंग वॉल संदर्भात मागील वेळी चर्चा झाली त्याबाबतची Update, तसेच संयुक्त पाहणी दौरा करण्याबाबत सुचना दिल्या होत्या त्याच्या अहवालाबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत स्मार्टसिटीचे मु.का.अ. श्री.मोरे यांनी खुलासा केला. NEERI च्या DPR मध्ये त्याठिकाणी १०% काम करता येईल असा उल्लेख आहे. शिवाय हे काम करतांना कुठली परवानगी घेण्याची आवश्यकता नाही असा GR सुध्दा असल्याचे | आयुक्त महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नमुद केले. त्याठिकाणच्या Sewer line, Storm water line ह्या टिकवून ठेवण्यासाठी हे करणे आवश्यक आहे. आणि हे करतांना कुठली परवानगी घ्यायची आवश्यकता नाही असा Irrigation चा GR असल्याचे नमुद केले.<br>नदी कनारी स्थानिक स्वराज्य संस्थेची, महापालिकेची परवानगी घेणे अपेक्षित असल्याचे Irrigation चे म्हणने असल्याचे श्री.पगारे यांनी नमुद केले.<br>➢ महापालिका आयुक्तांनी जलसंपदा विभाग, मु.का.अ. स्मार्टसिटी, उपसमिती सदस्य यांची एकत्र बैठक घेऊन सदर मुद्दा Clarify करुन घ्यावा. पुढील बैठकीवेळी त्याबाबतचा पुर्तता अहवाल ठेवावा. | आयुक्त महानगरपालिका, अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग, मु.का.अ.स्मार्टसिटी उपसमिती सदस्य |
| ८. | ना.औ.वि.कें. एकलहरे | १) महापालिका हद्दीतील STP मधुन निघणाऱ्या पाण्यावर प्रकल्प चालविणे संबंधीच्या मुद्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत उपस्थित प्रतिनिधी श्री.झाल्टे, वरिष्ठ रसायनतज्ञ यांनी नमुद केली की, पॉवर स्टेशन हे सिवेज पाण्यावर चालविण्याबाबत IIT ची टिम येऊन गेली होती. त्यांनी रिपोर्ट HO ला पाठविलेला आहे. परंतु मध्यंतरी नाशिकचे पॉवर स्टेशन चालविण्याबाबत साशंकता निर्माण झाली होती. त्यामुळे बजट कमी करण्यात आले होते. आता २०३० पर्यंत पॉवर स्टेशन चालवायचे आहे असे वरीष्ठ स्तरावरुन तोंडी सांगण्यात आले आहे. त्यामुळे आता याबाबत प्रोसेस सुरु आहे. फॉलोअप घेत असलेबाबत नमुद केले. | ना.औ.वि.कें. एकलहरे |
| | ना.औ.वि.कें. एकलहरे | २) एकलहरेच्या येथून पिण्याच्या पाण्याचा जिल्हापरिषद, महापालिका, व NTPC च्या Issue बाबत विचारणा करण्यात आली.<br>पिण्याचे पाणी दारणाच्या चेहडीच्या पंपींग मधुन घेत असुन त्यामध्ये वालदेवीचे थोडे Contamination आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे Parameters वाढून जात आहे. सदरचे पाणी पुढे पाच खेड्यांना सामनगाव, कोटमगाव, हिंगणवेढे, खेडगाव यांना दिले जाते. एकलहरे बॅरेजमध्ये येणारे पाणी हे सिवेज वॉटर असुन त्याचा Domestic साठी वापर करत नाही. पावर स्टेशनच्या STP चे Standerd parameters शी ते मॅच होत नसल्याचे नमुद केले.<br>➢ महापालिकेने व जिल्हापरिषदेने तेथील पाण्याची Quality monitor करुन घ्यावी. | आयुक्त महानगरपालिका, मु.का.अ. जिल्हा परिषद |
| | ना.औ.वि.कें. एकलहरे | ३) महापालिकेच्या मागणीनुसार एक डेटा त्यांना दिला होता. त्यांनी एक Advanced Global security नावाची एजन्सी नेमली आहे. ती STP चे Treated water हे पावर स्टेशनला Use करण्याबाबत परवानगी देणार असल्याचे नमुद केले. | आयुक्त महानगरपालिका, ना.औ.वि.कें. एकलहरे |
| ९. | ना.म्यु.स्मार्टसिटी डे.कॉ.लि. | १) कुंडांचे De-Concretization बाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत स्मार्टसिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे यांनी नमुद केले की, ५ कुंडांचे Concretization पुर्ण काढण्यात आले आहे. त्यानंतर १२ कुंडांचे D-Concretization स्मार्टसिटी बोर्डाने तीन सदस्यांची कमिटी नेमली आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त व पोलिस आयुक्त हे सदस्य आहेत. त्यांची व्हिजीट करुन झाल्यावर काढता येईल.<br>➢ Concretization काढावयाचे यापुर्वीच ठरले आहे. कमिटीची व्हिजिट करुन तातडीने कार्यवाही करुन घ्या, पावसाळ्यापुर्वी काम झालेले पाहिजे. | मु.का.अ. स्मार्टसिटी<br>आयुक्त महानगरपालिका, पोलिस आयुक्त, जिल्हाधिकारी, मु.का.अ.स्मार्टसिटी |
| | ना.म्यु.स्मार्टसिटी डे.कॉ.लि. | २) बलुन बंधाऱ्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>सदरचे काम बोर्डापुढे पेंडींग विषय असल्याने काम सुरु झालेले नसल्याबाबत श्री.मोरे यांनी नमुद केले.<br>➢ बोर्डची मिटींग बोलावुन विषय मार्गी लावण्यात यावा. | मु.का.अ. स्मार्टसिटी |

| | | | |
|---|---|---|---|
| | ना.म्यु.स्मार्टसिटी डे.कॉ.लि. | **३)** निळकंठेश्वर महादेव मंदीराच्या पायऱ्या तोडल्याच्या तक्रारीबाबत विचारणा करण्यात आली.<br>सदरचे काम झाले असल्याबाबत श्री.मोरे यांनी नमुद केले. | मु.का.अ. स्मार्टसिटी |
| **१०.** | नाशिक महानगरपालिका<br><br>नाशिक महानगरपालिका | **१)** नंदीनी नदीपात्रात कचरा टाकण्यापासुन लोकांना परावृत्त करण्याचे काम करणारे श्री.चंद्रशेखर पाटील यांना २६ जानेवारीला पालिकेतर्फे पुरस्कार देणेबाबत विचारणा करण्यात आली.<br>२६ जानेवारी रोजी महापालिका कडून पुरस्कार देण्यात आला असलेबाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले.<br>**२)** नदीच्या पुलांवर जाळया बसविणे, जिथे जाळया तुटल्या आहे तेथे दुरुस्ती करणे याबाबत विचारणा करण्यात आली.<br>काही ठिकाणी नविन जाळया लावल्या असलेबाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले. पुढील बैठकीवेळी सविस्तर माहिती दिली जाईल असे सांगितले.<br>➢ नद्या व त्यावरील पुलांनिहाय संख्यात्मक व सविस्तर माहिती देण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| **११.** | ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि.<br><br>ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि.<br><br>पोलिस विभाग नाशिक<br><br>नाशिक महानगरपालिका<br><br>म.प्र.नि.मंडळ नाशिक<br><br>म.प्र.नि.मंडळ नाशिक | **तक्रारीबाबत.**<br>**१)** गोदावरी नदीत पुररेषेत बांधलेल्या सिमेंट कॉंक्रीट भिंती बाबत श्री. निशीकांत पगारे यांची दि.११.०१.२०२२ व दि.०३.०२.२०२२ रोजीच्या तक्रारीबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत श्री.पगारे यांना उत्तर दिले असल्याचे श्री. मोरे यांनी नमुद केले.<br>➢ सदर दिलेले उत्तर आज मान्य करायचे का याबाबत विचारणा केली असता श्री.पगारे यांनी त्यास होकार देऊन सहमती दर्शविली.<br>**२)** गोदावरी नदीत सोडत असलेल्या गटारींच्या सांडपाण्या बाबत श्री. निशीकांत पगारे यांची दि.२४.०१.२०२२ रोजीच्या तक्रारीबाबत विचारणा करण्यात आली.<br>सदरची तक्रार रामवाडीच्या लेंडीनाल्या विषयी होती त्याबाबत पुर्तता झाली असल्याचे श्री.मोरे यांनी नमुद केले.<br>➢ तक्रारदारास उत्तर देण्यात यावे व त्याची प्रत इकडेस पाठविण्यात यावी.<br>**३)** गोदावरी प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्ताबाबत श्री. राजेश पंडीत यांचे दि.९.११.२०२० रोजीच्या इमेलबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत पोलिस आयुक्त कार्यालयाचे श्री.चौधरी यांनी झोन-१ मधुन बंदोबस्त पुरविण्यात येत असलेबाबत सांगितले.<br>➢ सदर बाबत तक्रारदारास लेखी उत्तर देण्यात यावे व त्याची प्रत इकडेस पाठविण्याबाबत सुचना दिली.<br>**४)** निळया पुररेषेतील बांधकामा बाबत श्री. राजेश पंडीत यांच्या दि.०६/०६/२०२२ रोजीच्या तक्रारीबाबत महापालिकेने तक्रारदारास उत्तर देऊन त्याची प्रत इकडेस पाठवावी.<br>**५)** कोपरगाव येथील गोदावरी नदी प्रदुषणाबाबत श्री.आदिनाथ गोरखनाथ ढाकणे यांची दि.२०/६/२०२२ रोजीच्या तक्रारीबाबत विचारणा करण्यात आली.<br>सदरची तक्रार अहमदनगर विभागाशी संबंधीत असून त्यांना पाठवली असल्याचे उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले.<br>➢ तक्रारदारास उत्तर देऊन त्याची प्रत इकडेस पाठविण्याबाबत सुचना दिली.<br>➢ तसेच कोळपेवाडी साखर कारखान्याजवळील शाहजापूर येथील शेतकऱ्यांची साखर कारखान्यातून निघणाऱ्या Distillery, liquid Molasses त्यांच्या शेतात सोडल्यामुळे विहीरीचे पाणी खराब झाल्याची एमपीसीबीकडे तक्रार केले बाबत विचारणा करण्यात आली. | मु.का.अ स्मार्टसिटी<br><br>मु.का.अ स्मार्टसिटी<br><br>पोलिस आयुक्त<br><br>आयुक्त महानगरपालिका<br><br>प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्याबाबतची पाहणी केली असल्याचे उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले.<br>➢ सदर अहवालाची प्रत मला पाठविण्यात यावी व पुढील कारवाई करावी. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | ६) गोदावरी पात्रातील पाणवेली न काढले बाबत व इतर श्री.कैलास दिनकरराव देशमुख यांच्या दि.०४/०७/२०२२ रोजीच्या तक्रारींबाबत मनपाने तक्रारदारास उत्तर देऊन त्याची प्रत इकडेस पाठवावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ७) गोदावरी नदीत निळ्या पुररेषेत होत असलेल्या अवैध बांधकामाबाबत श्री.जगबीर सिंग व इतर २ यांनी दि.११/१०/२०२२ रोजी केलेल्या तक्रारीबाबत विचारणा करण्यात आली.<br>सदरचे काम पुररेषेत नसलेबाबत तक्रारदारास उत्तर दिले असल्याचे श्री.मुंडे यांनी नमुद केले.<br>➢ उत्तराची प्रत इकडेस पाठविण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | ८) गोदावरी नदीकाळी असलेले निळकंठेश्वर महादेव मंदीराच्या पायऱ्या तोडल्या बाबत सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग यांचे दि.०८/०३/२०२२ व ०७/१२/२०२२ च्या तक्रारीबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत त्यांना उत्तर दिले असल्याचे स्मार्टसिटीचे मु.का.अ. श्री.मोरे यांनी नमुद केले.<br>➢ उत्तराची प्रत इकडेस पाठविण्याबाबत सुचना दिली. | मु.का.अ स्मार्टसिटी |
| १२. | नाशिक महानगरपालिका | १) रेनवॉटर हार्वेस्टिंग बाबत मागील वेळी चर्चा झालेला मुद्या अधिवेशनात लक्षवेधी मध्ये मांडण्यात आला असलेबाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>➢ महापालिकेने यापुर्वी कबुल केले आहे की, प्रत्येक Buliding Permission देतांना रेनवॉटर हार्वेस्टिंगची तरतूद त्यात टाकणार, Completion च्यावेळी ते व्हेरीफाय करणार, आता पर्यंत जेवढे कम्पलीशन दिले त्याचे रेनवॉटर हार्वेस्टिंग चालु आहे किंवा नाही ते पाहणार, जे फंक्शनिंग नाही त्यांच्यावर दंड करणार असे महापालिकेने कळविले आहे. त्याप्रमाणे आकडेवारी दिली पाहिजे.<br>याबाबत मधल्याकाळातील दंडाची आकडेवारी आलेली नाही, Follow up चालू असल्याचे श्री.मुंडे यांनी नमुद केले. | आयुक्त महानगरपालिका |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ महापालिकेने कॅम्पलायन्सची विश्लेषणात्मक माहिती द्यावी व ती वेबसाईटवर देखील टाकावी. जेणेकरुन लोंकांनाही कळेल. ज्यांनी रेनवॉटर हार्वेस्टिंग केलेले नाही त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली याची साप्ताहिक माहिती वेबसाईटवर टाकण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| १३. | नाशिक महानगरपालिका | महापालिकेच्या प्लास्टीक कमीटीच्या बैठका होत नसलेबाबत श्री.पगारे यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>➢ महापालिकेने कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या. | आयुक्त महानगरपालिका |
| १४. | उपसमिती/ यंत्रणा/विभाग | याव्यतिरिक्त यापुर्वीच्या वेळोवेळी झालेल्या बैठका व त्यांचे इतिवृत्तात दिलेल्या सुचनेप्रमाणे संबंधित उपसमिती/यंत्रणा/विभागांनी योग्यती कार्यवाही करावी. | संबंधीत उपसमिती/ विभाग/अधिकारी |

वरील प्रमाणे चर्चा होऊन उपस्थितांचे आभार मानुन बैठकीचे कामकाज संपविणेत आले.

RADHAKRISHNA VITHALRAO GAME

Digitally signed by RADHAKRISHNA VITHALRAO GAME
Date: 2023.02.28 12:03:30 +05'30'

**(राधाकृष्ण गमे)**
**विभागीय आयुक्त, नाशिक**

स्थळ:- नाशिकरोड
दि.२८/०२/२०२३
क्र.कक्ष-१५/क.शु./ज.या.१७६-२०१२/८३/२०२३

**प्रत :- सर्व संबधीत (इमेलव्दारे)**